# जनता सहकारी बँक लिमिटेड, आजरा

## ता. आजरा, जि. कोल्हापूर.

शाखा-

मुख्य कार्यालय : मेन रोड आजरा. फोन नं. ०२३२३ - २४६२५२, फॅक्स : ०२३२३ - २४६९६४
Email : janatabank.ajara@yahoo.co.in

## एस.एम.एस./ए.टी.एम. कम डेबीट कार्ड मागणी अर्ज

मी आपले शाखेत असणाऱ्या माझ्या खालील खात्याकरिता एस.एम.एस./ए.टी.एम. मशीन सेवेसाठी अर्ज करीत आहे.

### ❊ खात्यासंबंधी माहिती ❊

खाते नं. :

खात्याचा प्रकार :

### ❊ अर्जदाराची माहिती ❊

खातेदाराचे नांव श्री.

सध्याचा पत्ता

पिन नं. :

टेलीफोन नं.

मोबा. नं. :

ई-मेल :

जन्म तारीख :

**SMS Terms & Conditions :**

1) The Customer Shall have the responsibility to advise the bank of any change in his/her mobile number or loss/theft of his/her mobile phone.
2) The Janata Sahakari Bank Ltd; Ajara. shall not be liable for nondelivery or delayed or flawed or distorted delivery of SMS Alerts.
3) The Bank reserves the right to decide the type of SMS services that shall be offered / to make additions / deletions to the service offered under the SMS Alerts service.

### ❊ डिक्लेरेशन ❊

मी सदर अर्जाच्या मागे असलेल्या बँकेच्या अटी आणि शर्ती व या बाबतचे नियम वाचले असून ते आम्हांला पुर्णपणे समजलेले आहेत. मी सदरच्या अटी, शर्ती, नियम स्विकारत असून त्या मला मान्य व कबूल असून त्यास व त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या पुढील बदलास मी बांधील आहे.

तारीख :

**खातेदाराची सही**

### ❊ बँकेच्या वापरा करिता ❊

**सदर खातेदाराची KYC पुर्ण करणेत आलेली आहे.**

| | |
|---|---|
| खाते नंबर | |
| कार्ड क्रमांक : | |
| कार्डाचा वापर सुरु तारीख : | |

अर्ज घेतलेला अधिकारी

नांव

हुद्दा :

सही :

**शाखा व्यवस्थापक**

# ए. टी. एम. सुविधेचे नियम

१. **खात्यावरील कमीत कमी शिल्लक :** ए. टी. एम. सवलत घेणाऱ्या ग्राहकाने त्याचे खातेवर बँकेकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सुचनेनुसार बँकेने ठरविलेली कमीत कमी शिल्लक रक्कम ५००/- ठेवणे बंधनकारक आहे. जर मर्यादेपेक्षा कमी रक्कम खात्यावर शिल्लक राहील तर बँकेने ठरविलेले चार्जेस आकारण्यात येतील. सदरची अट ही ग्राहकांनी ए. टी. एम. कार्डची सवलत चालू ठेवावयाची किंवा नाही याबाबत महत्वाचे आहे. तथापि सदरची सवलत कोणत्याही प्रकारचे कारण न देता पुढे चालू ठेवणे अथवा काढून घेणेचा सर्वाधिकार बँकेने राखून ठेवला आहे.

२. **पैसे काढण्याबाबतची मर्यादा :** ग्राहकाना एका दिवसामध्ये त्यांचे खात्यावरील शिल्लक रक्कमेपैकी रक्कम रुपये २०,०००/- काढता येईल व रु. ५०,०००/- पर्यंत Post Transaction करणेत येतील.

३. **ग्राहक ए. टी. एम. कार्ड सवलत :** नवीन ए. टी. एम. कार्ड विनामुल्य देणेत येईल व डुप्लीकेटसाठी रक्कम रुपये १००/- चार्जेस आकरणेत येतील.

४. **वैयक्तीक ओळख क्रमांक** (PIN. No.) : सर्व ग्राहकांनी ए. टी. एम. चा वापर सुलभ होणेसाठी, त्यांचे वैयक्तीक ओळख क्रमांक निवडणे आवश्यक आहे. सदरचा ओळख क्रमांक हा गोपनीय असून, त्यामुळे ए. टी. एम. कार्डचा वापर फक्त अधिकृत व्यक्तीलाच करता येईल. सदरचा ओळख क्रमांक कोणत्याही व्यक्तीस सांगू नये. किंवा दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीस सुगावा लागेल अशा ठिकाणी लिहू नये. ओळख क्रमांक उघड करणे किंवा त्याच्या गुप्ततेबद्दलची पुरेशी सुरक्षा याबाबतची संपूर्ण जबाबदारी ग्राहकांची राहील. सदरचे ओळख क्रमांकाने केलेल्या सर्व व्यवहारांची जबाबदारी ग्राहकांची राहील आणि सदरचे व्यवहारांच्या नोंदी त्या ग्राहकावर बंधनकारक राहतील.

५. **संयुक्त खाते :** भागीदारी फर्म, प्रायव्हेट लिमिटेड कंपनी, सहकारी संस्था, ट्रस्ट, एच. यू. एफ. व्यक्तीच्या खात्यांना ए. टी. एम. सुविधा देता येणार नाही. पण संयुक्त खातेदाराचे बाबतीत पहिल्या नावाने ए. टी. एम. कार्ड दिले जाईल व कार्डासंबंधी सर्व जबाबदारी दोघांचीही राहील.

६. **कार्डाची मालकी :** सदरचे कार्ड ही बँकेची मालमत्ता असून ही सवलत बँक कोणत्याही प्रकारचे कारण न देता काढून घेऊ शकते. रद्द करू शकते. अशा वेळी सदरचे कार्ड बँकेस परत करणे बंधनकारक आहे. अशा प्रकारे कार्ड रद्द केले नंतर काडचि शुल्क परत केले जाणार नाही.

७. **कार्ड हरविले/चोरीला गेले बाबत :** जर ग्राहकांचे कार्ड हरविले किंवा चोरीला गेले तर अशा वेळी ग्राहकांनी ताबडतोब बँकेस लेखी कळविले पाहिजे. जर अशा कार्डवरून कोणत्याही प्रकारचा व्यवहार झालेस आणि सदरचे कार्ड हरविलेबाबत किंवा चोरी झालेबाबतची किंवा ए. टी. एम. कार्ड रद्द करणेबाबत सुचना दिली नसलेस अशा व्यवहाराची संपूर्ण जबाबदारी खातेदारांचीच राहील. एकदा सदरचे कार्ड हरविले/चोरीस गेलेबाबत किंवा खराब झालेबाबत सुचना दिलेनंतर ते कार्ड परत सापडले तरी ते पुन्हा वापरता येणार नाही याची दखल ग्राहकांनी घ्यावी. नवीन कार्डसाठी बँकेने ठरविलेले चार्जेस आकारण्यात येतील.

८. **फी/ चार्जेस :** सदरचे कार्डासंबंधी बँकेने ठरविलेली फी / चार्जेस रोखीने अगर कार्डधारकाच्या खात्यास नावे टाकून वसूल केले जातील.

९. **ए. टी. एम. मशीन :** खातेदाराच्या जानतेपणी / अजाणतेपणी जर ए. टी. एम. मशीनला जर कांही नुकसान पोहचले तर त्याची जबाबदारी खातेदारावर राहील. तसेच यांत्रिक / तांत्रिक बिघाडामुळे मशीन बंद पडल्यास होणाऱ्या गैर सोयीस बँक जबाबदार राहणार नाही.

१०. कार्डधारकास कोणत्याही प्रकारची पूर्व सुचना न देता सदर अटी / नियमामध्ये जादा अटी घालणे / वगळणे किंवा बदलणे बाबतचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. ए. टी. एम. कार्डधारकांनी ए. टी. एम. कार्ड घेतल्यानंतर सदरच्या अटी, शर्ती, पूर्णपणे काळजीपूर्वक वाचल्या आहेत व त्यांचेवर बंधनकारक व त्यांना कबूल व मान्य आहेत, त्यानंतर सही केली आहे. तसे समजण्यात येईल.

११. ए. टी. एम. कार्डची मुदत दहा वर्षे राहील.

१२. जर ग्राहकाच्या खात्यावर कोणतेही अनाधिकृत व्यवहार दृष्टीक्षेपास आल्यास त्या ग्राहकाने सदर बाबतची लेखी सुचना बँकेस त्वरीत देणे आवश्यक आहे.

१३. कार्डधारकाने स्वत:च धोका/अफरातफर, जाणतेपणी व अक्षम्य निष्काळजीपणा केलेला असल्यास अशा बाबतीत सदरची रक्कम कार्डधारकाकडून देय राहील.

१४. आपला पिन नंबर विसरलेस नवीन नंबरकरीता मागणी अर्ज घेणेचा आहे व याकामी रु. २५ + सेवाकर आकारणेत येईल. नवीन पिन नंबर मिळणेस किमान ८ दिवसाचा कालावधी लागतो

१५. इतर बँकेच्या ए. टी. एम. मधून रक्कम काढली अथवा काढण्याचा प्रयत्न केलेनंतर, कार्डधारकाची सदरची रक्कम मिळाली नाही अशी त्यांची तक्रार असलेस तशी लेखी तक्रार आमच्या संबंधीत शाखेत सर्व तपशीलासह १५ दिवसात करावी. त्यानंतर बँकेकडून सदर बाबत NPCI नेटवर्क यांचेकडे सर्व माहिती पाठवून दिली जाईल आणि त्यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील. यासाठी अर्ज दिल्यापासून सात दिवसाचा कालावधी लागेल.

१६. जर कार्डधारकाचे ए. टी. एम. कार्ड गहाळ झालेस त्या कार्डधारकाने डुप्लिकेट ए. टी. एम. कार्डाची मागणी केल्यास कार्डधारकाने रु. २००/- चा इंडेम्निटी बाँड लिहून देणे आवश्यक आहे. व डुप्लिकेट कार्डसाठी रु. २००/- फी आकारणेत येईल.

१७. खात्यामध्ये कमीत कमी शिल्लक रक्कम व ए. टी. एम. कार्ड सुविधा फी वेळोवेळी कमीजास्त करणेचा अधिकार बँकेला राहील.

वरील सर्व अटी व नियम मी वाचले असून ते मला मान्य व कबूल आहेत.

**खातेदाराची सही**